विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळा कार्यक्रम अहवाल ११ व १२ मे २०२२

Title of Programme : मुद्रितशोधन कार्यशाळा
Name of Organizing Department: विद्यार्थी विकास मंडळ व मराठी विभाग
Name of the Coordinator of the Programme: प्रा, संदीप थोरात
Date of the Programme : ११ व १२ मे २०२२
Venue: हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर
Target Group : पदवी स्तरावरील विद्यार्थी
Number of Participants: ७५
Name of Resource Person : डॉ. संजय शिंदे व डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. प्रतिक्षा खराडे
Total Expenditure for the Programme : ५०००/-
Source of Funding: विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
Report: विद्यार्थी विकास मंडळ व मराठी विभाग उपक्रम अहवाल

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थी विकास मंडळ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभाग यांच्या वतीने ११ व १२ मे २०२२ रोजी विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा समारोप दि. २१ मे रोजी आयोजित करण्यात आला. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा. संदीप थोरात, डॉ. राजेंद्र शिरसी, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. गणेश धुमाळ डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. विकास रासकर, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. गणेश मोढवे उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांचा कौशल्याधिष्ठित विकास होण्यासाठी भाषेचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक असून त्यांना वाचन, लेखन, संभाषण, संवाद कौशल्यांच्या स्वरूपातील भाषेचे उपयोजन प्रभावी करता आले तर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात असे प्रतिपादन केले. डॉ. शिरीष पिंगळे पुढे म्हणाले की, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याने भाषिक आविष्काराच्या विविध रूपांची ओळख करून घ्यायला हवी. विद्यार्थ्यांना आपल्या भाषेत उत्तम पद्धतीने संवाद साधता येणे, सर्जनशीलतेने लिहिता येणे, स्वतःचे विचार प्रकट करता येणे ही काळाची नितांत गरज बनली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेत ११ मे २०२२ रोजी प्रा. प्रतीक्षा खराडे यांनी प्रमाणभाषा लेखन या विषयावर तर १२ मे २०२२ रोजी डॉ संजय शिंदे यांनी मुद्रितशोधनाचे महत्त्व, डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी शुद्धलेखनाचे नियम या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यशाळेत सुमारे ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रा. संदीप थोरात यांनी मानले.

| | | |
|---|---|---|
| Thorat | | |
| प्रा. संदीप थोरात | डॉ. संजय शिंदे | डॉ. शिरीष पिंगळे |
| विद्यार्थी विकास मंडळ | मराठी विभागप्रमुख | प्राचार्य |

मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.
Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar,Tal.Khed,Dist.Pune.

मराठी विभाग व विद्यार्थी विकास मंडळ – अहवाल २०२१- २०२२ Page 1




दि. ११ मे २०२२ रोजी  मुद्रितशोधन कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे




मुद्रितशोधन कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांचे स्वागत करताना डॉ. राजेंद्र शिरसी



मुद्रितशोधन कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी उपस्थित विद्यार्थी




डॉ संजय शिंदे यांनीमुद्रितशोधनाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.




डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी शुद्धलेखनाचे नियमया विषयावर मार्गदर्शन केले.



मुद्रितशोधन कार्यशाळा – लेखी परीक्षा देताना विद्यार्थी

PR015

विद्याविकास

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

स्वररंग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. संतोष परचुरे

संचालक

संदर्भ क्र.विविमं / 2021-22/194/140 | दिनांक :-१५ Feb २०२२

प्रति,

**मा.प्राचार्य/संचालक,**

खे ता शि प मंडळ हुतात्मा राजगुरु महाविद्यालय पत्ता:

राजगुरुनगर ता.: खेड जि: पुणे पिनकोड: 410505

विषय :-मुद्रितशोधन कार्यशाळा

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व आपले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुद्रितशोधन कार्यशाळा ('क' गट) शासन व स्थानिक प्रशासनाच्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक सर्व नियम व निर्बंधांच्या अधीन राहूनच या योजनेची परिस्थितीनुरूप अंमलबजावणी करून आयोजित करण्यास आपणास मान्यता देण्यात येत आहे. माहे मे 2022 पूर्वी मुद्रितशोधन कार्यशाळा आयोजित करण्यात यावी. सदर कार्यशाळा आयोजनासाठी आपल्या महाविद्यालयास रु. 5000 /- पर्यंत अर्थसाह्य मंजूर करण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त मुद्रितशोधन कार्यशाळाकरिता होणारा ज्यादा खर्च महाविद्यालयाने करावा.

संचालक विद्यार्थी विकास मंडळ तसेच संबंधित मा. जिल्हा समन्वयक यांचेशी विचारविनिमय करून कार्यशाळेची कार्यक्रम रूपरेषा निश्चित करावी. सदर कार्यशाळेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित आपल्या महाविद्यालयाच्या परिसरातील संबंधित सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थांना पत्र पाठवून आवश्यकतेनुसार सबंधीताना सहभागी करून घ्यावे.

सदर कार्यशाळा झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत / १५ मार्च, २०२२ पूर्वी सदर कार्यशाळा झाल्यास माहे मार्च,२०२२ किंवा केंद्रीय लेखा परीक्षणाच्या वेळी हिशेब या विभागास सादर करावा. सोबत विद्यार्थ्यांची यादी, विद्यार्थी अभिप्रायासह (Feedback Form) तसेच या उपक्रमाविषयी प्रातिनिधिक स्वरुपात काही विद्यार्थ्यांची स्फूट टिप्पणी, कार्यशाळेचे फोटो, कार्यवाहीचा अहवाल www.unipune.ac.in-Students Development-BSD Online-College Login-Main Menu-Students' Development-Central Audit-Scheme Proposal FeedBack येथे ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची प्रत, खर्चाचा तपशील, त्यासबंधीची मूळ देयके (नवीन वित्तीय धोरणानुसार) मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कळावे, ही विनंती.

**१. शासन व स्थानिक प्रशासनाच्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक सर्व नियम व निर्बंधांच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी करावी.**

**२. शासन निर्देशानुसार संपूर्ण लसीकरण झालेले असल्याची खात्री करून घेऊनच इच्छुक विद्यार्थ्यांना या योजनेत समाविष्ट करावे.**

**३. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्थानिक प्रशासन, आरोग्य विभाग, संस्था प्रशासन, महाविद्यालय प्रशासन इत्यादी यंत्रणांकडून आवश्यकतेनुसार योग्य ती परवानगी प्राप्त करून घेण्यासंबंधी आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.**

**४. विद्यार्थ्यांकडून कोविड अनुरूप वर्तन व समूहशिस्त यांचे काटेकोरपणे पालनसुनिश्चित करण्यासाठी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांना अथवा / तसेच पालक यांची समूह सहभागासाठी संमती अथवा हमी आवश्यकतेनुसार प्राप्त करून घ्यावी.**

**५. कोविडच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची, संपूर्ण सुरक्षेची सर्वस्वी जबाबदारी ही सबंधित महाविद्यालय/ परिसंस्थेचीच आहे; याची नोंद घ्यावी.**

**६. कोविड अनुरूप वर्तन आणि कोविड प्रतिबंधात्मक नियम व निर्बंधांचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिकृत यंत्रणांकडून होणाऱ्या कायदेशीर प्रशासकीय/दंडात्मक इत्यादी स्वरूपाच्या संभाव्य कार्यवाहीस सबंधित महाविद्यालय/परिसंस्था संपूर्णपणे जबाबदार असून याबाबत विद्यापीठाचे कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/आर्थिक उत्तरदायित्व असणार नाही.**

**७. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना च्या लसीकरणाची माहिती या विभागाच्या पत्र क्रमांक विविमं/२०२१-२२/०३४, दिनांक २८/१०/२०२१ नुसार भरणे अनिवार्य आहे.(संबंधित पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थी विकास मंडळाच्या परिपत्रकात उपलब्ध आहे.)**

भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in

कार्यालय: ०२०-२५६२२६८०, ०२०-२५६२२६८७, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

८. शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा वेळोवेळी जारी होणाऱ्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक आदेशाच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी, कार्यान्वियन, स्थगिती अथवा समाप्ती करणे बंधनकारक असून याबाबत महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या स्तरावर योग्य ते निर्णय घ्यावेत.

याचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. सदर योजना आपल्या महाविद्यालयात माहे मे,२०२२ पर्यंत राबविणे अनुज्ञेय आहे.

आपला

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
कार्यालय: ०२०-२५६२२६८०, ०२०-२५६२२६८७, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

प्रा. संदीप थोरात
विद्यार्थी विकास मंडळ

डॉ. संजय शिंदे
मराठी विभागप्रमुख